Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 411-416

DOI: 10.5281/zenodo.10130258

Original Research Article

# महात्मा गांधी यांचा चंपारण्यातील सत्याग्रह

लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब ता. कळंब जिल्हा: उस्मानाबाद ४१३५०७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: haribhaupawde123@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

"संपूर्ण विश्वात हिंसा, हुकूमशाही, लालसा आणि भौतिकतेमुळे ताणतणाव ज्या प्रमाणात वाढत राहतील, त्याच वेगाने : किंबहुना अधिकाधिक गती मानपणे विश्वभरात महात्मा गांधीजींचे विचार,कार्य आणि जीवन संदेश विशेषता:युवा पिढीत संस्कारीत व्हावेत, हीच अंतरिक सद्भावना."

\- डॉ. भवरलालजी जैन

एक सर्वसामान्य माणूस आपल्या जीवनामधील असामान्य प्रयत्नाने अनेक प्रकारे उंची गाठू शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे महात्मा गांधीजींचे एकंदरीत जीवन होये.महात्मा गांधी यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी गुजरात मधील पोरबंदर या ठिकाणी झाला होता. त्यांचे मूळ नाव मोहनदास करमचंद गांधीअसे होते.लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणत.आज संपूर्ण विश्वात भारताची ओळख ही महात्मा गांधींच्या नावाने होते. भारतात महात्मा गांधी यांचे नाव माहित नाही असा एकही माणूस शोधूनही सापडणार नाही. ब्रिटिश सत्तेच्या अनेक वर्षाच्या जोखडा तून भारतीयांची मुक्तता करण्याचे महान कार्य महात्मा गांधी यांनी केले. या स्वतंत्र आंदोलनामध्ये सर्वसामान्यांना सहभागी करून घेत ब्रिटिशांविरुद्ध जो महात्मा गांधींनी लढा उभारला, या लढ्याला सत्य,अहिंसा या नैतिक मूल्याची जोड देऊन एक अधिष्ठान प्राप्त करून दिले. त्यामुळेच आज त्यांना भारताचे राष्ट्रपिता म्हणूनओळखल्या जाते. दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतल्यानंतर महात्मा गांधी यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध बिहार जिल्ह्यातील चंपारण्य येथे सर्वप्रथम जो लढा उभारला त्याविषयी प्रस्तुत शोधनिबंधातून प्रकाश टाकण्यात आला आहे.

## चंपारण्यातील सत्याग्रह

बिहार प्रांताच्या वायव्येला चंपारण्य नावाचा जिल्हा आहे,प्राचीन काळामध्ये चंपारण्य हे जनकाचे राज्य म्हणून ओळखले जायचे. परंतु पुढे ब्रिटिश वसाहतवादाच्या काळामध्ये येथे निळ मळेवाल्यांनी आपली सत्ता प्रस्थापित केली,तेव्हा पासून हा प्रदेश रावण राज्या म्हणून ओळखल्या जाऊ लागला.चंपारण्य जिल्ह्यात मोतीहारी आणि बेटिया अशी दोनच शहरी असून 2841 खेडे होते. येथील निळवाल्यांनी तीन काठीया नावाची पद्धत स्थानिकावर लादली होती. त्यानुसार आपण राबत असलेल्या शेत जमिनीत प्रत्येक

शेतकऱ्याने एक चतुर्थांश भागात निळ पीक काढणे बंधनकारक होते,इतकेच नव्हे तर ते सगळे निळपीक कोणत्याही मोबदल्याशिवाय जमीन मालकाला द्यावी लागत होते.त्या शेतकऱ्यांपैकी बहुतेक सगळे शेतकरी अशिक्षित,अनाक्षरी होते. आपल्या देशात आपण ब्रिटिशाचे गुलाम झालो आहोत, याची त्यांना कल्पनाही नव्हती.[1] याचा फायदा घेत तेथील नीळ तयार करताना इंग्रज मालक हिंदी शेतकऱ्याचे अनेक शोषण करतात,अशा प्रकारची माहिती महात्मा गांधी यांना समजली .पाटणा हे चंपारणेच्या वाटेवरच होते तेथे गांधीजींना बरीच प्रसिद्ध मंडळी भेटली ब्रिज किशोर बाबू, राजेंद्र प्रसाद, एका कॉलेजमध्ये प्राचार्य आचार्य कृपलानी अशी सगळी मंडळी यांनी चंपारण्यातील या सर्वांनी शेतकऱ्यांच्या समस्या सांगितल्या.तेव्हा दि.10 एप्रिल 1917 रोजी महात्मा गांधी पाटण्याला गेले ते तिथून मुजफ्फरला गेले. बिहार मधील शेतकऱ्यांना निर्भय बनून त्यांना न्याय मिळवून देण्याचा गांधींनी निश्चय केला होता. त्यासाठी त्यांनी तेथील वकील मंडळीना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले व मळे वाल्यांच्या असोसिएशनचे चिटणीस विल्सन यांची भेट घेऊन चंपारण्यात येण्याचे कारण सांगितले,परंतु मळे वाल्यांच्या असोसिएशनच्या पदराधिकारी व कमिशनर ने या भानगडीत न पडण्याचे गांधीजींना कळविले व या प्रांतातून बाहेर पडण्याचा सल्ला दिला. परंतु गांधीजींनीतो मान्य केला नाही.[2] तेव्हा ब्रिटिश अधिकाऱ्यांनी गांधीजींना चंपारण्यातून वापस जाण्यास सांगितले, तसा आदेशच ब्रिटिश सत्तेने महात्मा गांधी साठी काढला, मात्र गांधीजींनी नम्रतापूर्वक तो आदेश नाकारून त्या बदल्यात जी सजा मिळेल ती सहन करण्याची तयारी दर्शविली, अन्याया चा शांततापूर्वक मार्गाने विरोध आणि अन्याय आदेश यांचा नम्र नकार हे भारतीय आंदोलनातील नव्याने दिसून आल्याने[3], याची सर्वत्र चर्चासुरू झाली. पुढे महात्मा गांधी तीन काठीया पद्धतती द्वारे होणारा अन्याय दूर करण्यासाठी  मोतीहारीला पोहोचले, तेव्हा तेथील मॅजेस्टेटने तुमच्या वास्तव्यामुळे तेथील शांततेला धोका येण्याचा संभव असल्यामुळे जिल्हा सोडून जाण्याचा हुकूम कलम 144 अंतर्गत फर्माविला. गांधीजींनी तो हुकूम मोडला व मॅजिस्ट्रेट पुढे उभे करताच गुन्ह्याची कबुली देऊन शिक्षा भोगण्यास तयारी असल्याचे स्पष्ट केले.[4] शेवटी ब्रिटिश सत्तेने गांधीजींनी जामीन भरावा या अटीवर सोडण्याची तयारी दर्शविली परंतु गांधीजींनी जामीन भरण्याचे स्पष्टपणे नाकारले तेव्हा नाईलाजाने ब्रिटिश सरकारने त्यांना सोडून दिले. प्राथमिक अवस्थेतील गांधीजींवरील खटला समाप्त झाल्यानंतर गांधीजी मोतीहारी या ठिकाणी निवासाला आले. येथे शेतकऱ्यांनी आपले ग्राहणे मांडण्यासाठी रांगाच रांगा लावल्या होत्या. तेव्हा गांधीजींनी आपल्या सहकार्यामार्फत शेतकऱ्यांची साक्ष नोंदविण्यास सुरुवात केली होती. ही प्रक्रिया सकाळपासून ते सायंकाळ पणे दिवसभर अविरतपणे सुरू होती. एवढेच नव्हे तर चंपारण्यातील अनेक भागात

फिरून महात्मा गांधींनी शेतकऱ्यांच्या साक्षी नोंदवून घेतल्या होत्या. व त्या साक्षीच्या अनेक प्रति तयार करण्यात येऊन त्या बिहारचे गव्हर्नर, बेटिया राज्याचे मॅनेजर,मळेवाल्यांच्या असोसिएशनचे सेक्रेटरी व अनेक हिंदी पुढारी यांच्याकडे पाठविण्यात आल्या.सुमारे 2250 शब्दा गांधींनी चंपारण यातील प्रश्न संबंधाने एक उत्कृष्ट निवेदन तयार केले. त्याचा सारांश असा, 'शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला कधी मिळालेला नाही. नकली निळ बाजारात येऊन लागल्यामुळे तेथील निळी चे भाव कमी करावे लागले आणि त्यामुळे होणारे नुकसान मळेवाले या शेतकऱ्याकडून वसूल करू लागले कवळ्या मुलांकडूनही मळेवाले काम करून कामाकरिता लोकांना अगदी शिल्लक कारणावरून दंड करण्यात येतो या रयतेवर आपला वचक बसविण्यासाठी त्यांची गुरे कोंडवाड्यात नेऊन घालणे,त्यांच्या घरात शिपाई बसून ठेवणे, नाव्ही, सुतार,लोहार इत्यादी लोकांची मदत त्यांना मिळून न देणे, गावातील विहिरीचा उपयोग करण्यास मनाई करणे, आशा कितीतरी प्रकारे हे मळेवाले त्यांना छळीत असतात,मळेवाल्यांना दुखवण्याची माझी इच्छा नाही, त्यांचा रयतेला सहन करावा लागत असलेला अन्याय दूर व्हावा म्हणूनच माझी ही सारी खटपट आहे हे मळेवाले इंग्रज आहेत तेव्हा ते स्वतंत्र्याची भोक्ते असणारच,चंपारण्यातील आपल्या रयतेलाही अवश्य ते स्वतंत्र उपभोगू देण्यासाठी ही हरकत घेणार नाहीत अशा आशेनेच मी हे कार्य अंगावर घेतले आहे'.[5] महात्मा गांधी यांनी सर्व शेतकऱ्यांच्या व्यथा प्रथमता साक्षीच्या रूपाने गोळा केल्या, या साक्षीमध्ये कुठल्याही प्रकारच्या खोट्या तक्रारी नोंदविल्या जाणार नाहीत या संदर्भाने महात्मा गांधी यांनी विशेष अशी काळजी घेतली होती. त्यामुळे इंग्रज सरकारने देखील दखल घेत महात्मा गांधी यांना रांची या ठिकाणी गव्हर्नर ने चर्चा करण्यास बोलविले होते. या लढ्यादरम्यान महात्मा गांधी यांनी बातमीदारांना चंपारण्य सत्याग्रहात किंवा शेतकऱ्यांच्या साक्षी गोळा करत असताना, स्थानिक पातळीवर येण्यास उत्तेजन दिले नाही, किंवा वरिष्ठ पुढाऱ्यांनाही बोलविले नाही यासंदर्भात ने गांधीजी म्हणतात की, मालवीय जिने मला सांगून पाठविले होते की जरूर लागेल तेव्हा मला बोलवा मी यायला तयार आहे, त्यांनाही तसदी दिली नाही,लढायला मी कधीही राजकीय स्वरूप येऊ दिले नाही, घडणाऱ्या हकीकतीचा अहवाल प्रसंगानुसार मी मुख्य वर्तमानपत्राकडे पाठवीत असे ज्या ठिकाणी अंतिम उद्दिष्ट राजकीय असूनही प्रत्यक्ष अंगीकृत कार्यात राजकारणाला स्थान नाही त्या गोष्टीला राजकीय स्वरूप दिल्याने हेही नाही आणि तेही नाही अशी स्थिती होते आणि अशा तऱ्हेने विषयांतर न केल्याने दोन्ही सुरळीत चालतात हे मला पुष्कळ अनुभवाने दिसून आले होते. शुद्ध लोकसेवेमध्ये प्रत्यक्ष नाहीतर परोक्ष रीतीने राजकारण हे येते ही गोष्ट चंपारण्यातील हा लढा सिद्ध करीत होता.[6] अशाप्रकारे महात्मा गांधी यांनी आंदोलनादरम्यान कुठल्याही स्वरूपाचा गाजावाजा न करता, शेतमजुराला तीन काठ्या पद्धतीतून मुक्त करता येईल,मळेवाल्याकडून होणाऱ्या पिळवणुकीतून त्यांची कशा प्रकारे मुक्तता करता येईल यावरच महात्मा गांधी यांनी लक्ष केंद्रित केल्याचे प्रत्यक्षपणे दिसून येते.

महात्मा गांधींनी वर उल्लेख केल्याप्रमाणे सर्व शेतमजुरांची साक्ष नोंदवून माहिती गोळा केली, ती रीतसरपणे ब्रिटिश सरकार पुढे शेतकऱ्यांवर मळेवाडीकडून होणाऱ्या अन्यायाला शासन दरबारी वाचा फोडली, या चळवळीचा परिणाम असा झाला की ब्रिटिश सरकारचे लेफ्टनंट गव्हर्नर सर एडवर्ड यांनी निळ पीक काढणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्येची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली त्या समितीचे एक सदस्य म्हणून गांधीजींची नेमणूक करण्यात आली, साहजिकच समितीने जो अहवाल तयार केला तो शेतकऱ्यांच्या बाजूने होता .त्यामुळे सगळे शेत जमिनीचे मालक संतापले त्यांनी त्या अहवाला आपला विरोध दर्शविला त्यांच्या विरोधाला न जुमानता सर एडवर्ड यांनी शतकाहून अधिक काळ

अमलात असलेले तीन काठिया पद्धत रद्द केली त्यांनी सरकारी आदेश काढला.[7] अशाप्रकारे भारताच्या भूमीत सर्वप्रथम झालेल्या अहिंसात्मक सत्याग्रहाचा विजय झाला होता. ब्रिटिश सरकारने आदेश काढून ब्रिटिश मळेवाल्यांनी गरीब शेतकऱ्याकडून जुलूम जबरदस्तीने वसूल केलेल्या पैशातील 25% रक्कम त्यांना परत दिली. येथे गांधींचा शांततामय लढा यशस्वी झाल्याने ब्रिटिश माळेवाले ललित होऊन येथून निघून गेले.[8] हा सत्याग्रह महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली लढलेला गेला असल्यामुळे, सर्व श्रेय महात्मा गांधीजींच्या तत्त्वांनाच द्यावे लागेल असे म्हटले तर वावगे ठरू नये.

चंपारण्यातील आंदोलन हे महात्मा गांधींनी शेतमजूर मजुरांच्या निळ मळेवाल्याकडून होणाऱ्या शोषणाविरुद्ध लढा उभारला असला तरी हा लढा लढत असतानाच त्यांना असे वाटू लागले होते की चंपारण्यमध्ये नीट काम करायचे असेल तर खेडोपाडी शिक्षणाचा प्रवेश झाला पाहिजे याचे कारण म्हणजे लोकांचे अज्ञान कीव येण्याजोगे होते, गावातील पोरे भरकटत उनडत असत किंवा त्यांना दोन किंवा तीन पैसे मजुरी मिळेल, तेवढ्यासाठी आई-बाप त्यांना सारा दिवस निळीच्या मळयामध्ये राबवीत असत. त्याकाळी पुरुषा ची मजुरी 10 पैसे अधिक नव्हती, स्त्रियांची सहा पैसे व मुलांची तीन पैसे चार आणि मजुरी मिळेल तो मजूर भाग्यशाली समजला जात, अशा अवस्थेमध्ये महात्मा गांधींनी सोबत्यांबरोबर विचार करून सहा खेड्यामध्ये प्रथम मुलांसाठी शाळा उघडण्याचे ठरविले. यासाठी त्यांनी अशी आट घातली होती की त्याच गावाच्या पुढाऱ्यांनी घर आणि शिक्षकाचे जेवण एवढे द्यावे. व बाकीचा खर्च आम्ही पूर्वावा याचे कारण म्हणजे इकडच्या खेड्यांमध्ये पैशाचा झरा वाहत नव्हता.[9] यावरून स्पष्टपणे असे जाणवते की, महात्मा गांधी यांनी चंपारण यातील तीन काठीया पद्धत जी शेतकऱ्यावर अन्याय करत होती शेतकऱ्यांचे शोषण करीत होती एवढ्या पुरतेच हे आंदोलन मर्यादित न ठेवता, शेतकऱ्यांच्या समस्येच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. या आंदोलनात संदर्भात महात्मा गांधीजी असे म्हणतात की शेतकऱ्यांना संघटित करण्याची माझी पद्धती ज्यांना माहिती करून घ्यायची असेल त्यांनी चंपारण्यातील लढ्याचा अभ्यास केल्यास त्यांना बरीच माहिती मिळेल. त्या लढ्यातच सत्याग्रहाचा पहिला प्रयोग हिंदुस्तानात झाला व त्याचा काय परिणाम झाला ते सर्व देशाला माहित आहे ती एक सामुदायिक चळवळ बनली होती आणि आरंभापासून शेवटपर्यंत संपूर्णपणे अहिंसक राहिली होती. तीत वीस लाखावर शेतकऱ्यांचा हिताचा प्रश्न होता. एका शतकापासून शेतकऱ्यांना सहन कराव्या लागत असलेल्या एका विशिष्ट अडचणीच्या मुद्द्यावर लढा केंद्रित झाला होता. या अडचणीचे निवारण करण्यासाठी कित्येक हिंसक बंडे पूर्वी झाली होती, शेतकऱ्यांना दडपून टाकण्यात आले होते. अशा ठिकाणी अहिंसात्मक उपाय सहा महिन्यातच संपूर्ण यशस्वी झाला राजकीय जागृतीसाठी कोणत्याही प्रत्यक्ष प्रयत्ना न करताच चंपारण्यातील शेतकरी राजकीय दृष्ट्या जागृत झाले आपल्या अडचणीच्या निवारणाच्या कामी अहिंसा कशी कार्यक्षम होते. याचा प्रत्यक्ष पुरावा मिळाल्याने ते काँग्रेसकडे आकर्षित झाले आणि बाबू ब्रिज किशोर प्रसाद व बाबू राजेंद्र प्रसाद यांच्या नेतृत्वाखाली गेल्या सविनय कायदेभंगाच्या लढ्याच्या प्रसंगी त्यांनी चांगली कामगिरी करून दाखविली.[10] यावरून आपणास स्पष्ट म्हणता येते की, महात्मा गांधी यांनी सर्वप्रथम भारताच्या भूमीमध्ये अहिंसात्मक आंदोलनाची उभारणी करून तो थोड्याच कालावधीमध्ये यशस्वी करून दाखविला होता. या संदर्भाने गोविंद तलवळकर आपल्या पुस्तकात म्हणतात, महात्मा गांधींनी 1917 मध्ये बिहार मधील चंपारण यामधील पिडलेल्या कुळांची बाजू घेतली होती व एक प्रकारे आपल्या सविनय कायदेभंगाची प्रात्यक्षिक दाखविले, त्यांनी शेतकरी व मालकाची बाजू ऐकून घेऊन सरकार पुढे आपले मनाने यथायोग्य पद्धतीने मांडले. यात गांधीजींची सरशी झाली आणि भारतात गांधीयुगाचा

आरंभ झाला, त्यांनी जेव्हा अभिनव तंत्र वापरले. त्याचा देशातील राजकीय नेत्यांवर परिणाम होणे अपरिहार्य होते, म्हणून लोकमान्य टिळकांनी थोड्याच वर्षात गांधी हे देशाचे भावी नेते असल्याची ग्वाही दिली आणि आपल्या शेवटच्या दिवसात गांधीचे नेतृत्व स्वीकारण्याची सूचना त्यांनी आपल्या अनुयायांना केली होती. यामुळे अखिल भारतीय काँग्रेसची सूत्रे महात्माजिच्या हाती जाण्यास फारसा अवधी नाही असे अनेकांनी ओळखले.[11] होते. महात्मा गांधी यांनी चंपराण्याच्या सत्याग्रहांमध्ये भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला एक वेगळीच दिशा दिल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

सारांश रुपाने आपणास असे म्हणता येईल की, बिहारच्या भूमीमध्ये शेतकऱ्याचे अनेक काळापासून निळशेतीच्या माध्यमातून इंग्रजी मळेवाले शेतकऱ्यांवर तीन काठी पद्धती लादून त्यांचे शोषण करत होते. येथील अज्ञानी शेतकरी हे शोषण निमुटपणे सहन करत होते. परंतु काही स्थानिक लोकांच्या माध्यमातून याविषयी महात्मा गांधीजींना माहिती मिळाली, त्यामुळे महात्मा गांधीजींनी या शेतकऱ्यांची यातून सुटका करण्याचे निश्चित केले. यासाठी त्यांनी प्रत्यक्ष चंपारण्यात जाण्याचा निर्णय घेतला. सर्वप्रथम ब्रिटिश मळेवाले व ब्रिटिश सरकारकडून महात्मा गांधी यांना या आंदोलना पासून प्रावर्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, परंतु ब्रिटिश मळेवाले व ब्रिटिश सरकार यांना न जुमानता महात्मा गांधी आपल्या आंदोलनावर ठाम राहिले, त्यामुळेच ब्रिटिश सरकारने नाईलाज ने महात्मा गांधीजींना चंपारण्यात राहू दिले. चंपारण्यातील वास्तव्यात महात्मा गांधीजींनी स्थानिक शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणामध्ये शोषणाविरुद्ध साक्षी गोळा केल्या, व त्या ब्रिटिश सरकार पुढे मांडल्या, ब्रिटिश सरकारने महात्मा गांधीजींचे म्हणणे मान्य करून एक समिती स्थापन केली, या समितीच्या अहवालानुसार तीन काटिया पद्धत अवैद्य ठरवत इंग्रजी मळेवाल्याकडून शतकापासून होणारे शोषण रद्द बद्दल ठरविले. त्यामुळेच तीन काठीया पद्धत ही रद्द झाली. या आंदोलनादरम्यान महात्मा गांधीजींनी सर्वप्रथम भारतामध्ये अहिंसात्मक मार्गाचा स्वीकार करत, आंदोलन यशस्वी करता येते हे दाखवून दिले होते. एवढेच नव्हे तर सर्वसामान्य लोक जर एकत्र आले तर ब्रिटिश सरकार विरोधात आंदोलन उभारल्यास हे आंदोलन यशस्वी देखील होते हे दाखवून दिल दिले. व ब्रिटिश सरकार विरुद्ध चालू असलेल्या स्वातंत्र्यलढ्यास एक नवी दिशा देण्याची काम केल्याचे दिसून येते.

## सदर्भ सूची


१. मराठी अनुवाद अ. रा. याद्री :- बाळ गांधी,बापू झाले, त्यांची गोष्ट, प्रकाशक साहित्य अकादेमी, दिल्ली, 2013 (पृ. क्र.157)

२. एन.आर.अभ्यंकर :- राष्ट्रपिता महात्मा गांधी, प्रकाशन नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली,1967.(पृ. क्र.52)

३. डॉ.हनुमंत कुरकुटे :- गांधी विचारांची प्रसंगीकता संदर्भ हिंदवी स्वराज्य, प्रकाशक कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, 2022.(पृ. क्र.27)

४. डॉ. श्रीनिवास सातभाई :- आधुनिक भारताचा इतिहास (इ.स.1757 ते 1977), प्रकाशक विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद, 2014 .( पृ. क्र.324)

५. उपरोक्त, एन. आर. अभ्यंक :- राष्ट्रपिता महात्मा गांधी. (पृ. क्र.53)

६. मोहनदास करमचंद गांधी :- सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, प्रकाशक रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर, 2018. (पृ. क्र. 331)

७. उपरोक्त मराठी अनुवाद अ. रा. याद्री :- बाळ गांधी, बापू झाले, त्यांची गोष्ट, (पृ. क्र.161)

८. सिंह मनोज कुमार & चौधरी शैलेश कुमार :- भारतीय राजनीतिक चिंतन, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस दिल्ली. (पृ. क्र.3)

९. उपरोक्त मोहनदास करमचंद गांधी :- सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, (पृ. क्र. 333)

१०. महात्मा गांधी :- महात्मा गांधी विचार - संग्रह, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर – (2016.) मोहनदास करमचंद गांधी :- सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, प्रकाशक रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर, 2018. ( पृ. क्र.78)

११. गोविंद तळवळकर:- गांधी पर्व 1, प्रकाशक मौज प्रकाशन गृह मुंबई, 2018. ( पृ. क्र.1)